# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ११६–२०१०/ दिनांक :

श्री. इलाही मकबूल मंगळवेढे (मुल्ला),
मु.पो. बिळूर, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली — विरूध्द पक्षकार

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. इलाही मकबूल मंगळवेढे (मुल्ला), मु.पो. बिळूर,यांनी नवीन शेतीपंप वीज पुरवठा मिळावा यासाठी दि. ३०.१२.२००९ रोजी अर्ज केला आहे. तक्रारदाराचे म्हणणे की, वितरण वाहिनीचा विस्तार असलेने त्यांना दि. २९.१.२०१० पर्यंत चलन मिळणे जरुरी होते, ते मुदतीत दिले नाही.

त्यामुळे प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दाखल केली. त्यापूर्वी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. २७.४२०१० ला तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने दि. २८.४.२०१० रोजी आदेश पारित केला, त्यामध्ये विलंबाबाबत कृती मानकातील तरतुदीनुसार भरपाई द्यावी असे आदेश दिले. या आदेशाच्या नाराजीने तक्रारदाराने मंचाकडे दि. ४.६.२०१० रोजी प्रतिनिधी श्री. खापरे यांच्यामार्फत नमुना अ मध्ये तक्रार दाखल केली व त्यात कृती मानके विनियमातील तरतुदी प्रमाणे वीज पुरवठा मंजुरीसाठी झालेल्या विलंबाबाबत भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. २९.६.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदाराचा शेतीपंप नवीन वीज पुरवठा मागणी अर्ज दि. ३१.१२.२००९ ला प्राप्त झाल्याचे मान्य केले व त्यांस दि. २४.३.२०१० रोजी चलन देण्यात आले. त्यांचे ०३० कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. २७.७.२०१० ला सुनावणीस घेतली असतां, तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे प्रभारी सहाय्यक अभियंता संख श्री. मैंलापुरे व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग उपस्थित. तक्रारदार प्रतिनिधी यांनी चलन २४.३.२०१० ला मिळाल्याचे सिध्द करावे अशी मागणी केली. श्री. कुलकर्णी यांच्या विनंतीनुसार दुसऱ्या दिवशी प्रस्तुतच्या तक्रारीची सुनावणी घेण्यात आली तेव्हा वि.प.तर्फे श्री. राठोड, कनिष्ठ अभियंता, जत उप विभाग यांनी मंचासमोर तक्रारदार यांची दि. २४.३.२०१० ला चलन मिळाल्याची पोचपावती हजर केली. असे असले तरी, दि. २९.१.२०१० ते २४.३.२०१० या कालावधीतील ७ आठवड्याचा विलंब झाला आहे हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट दिसते. वि.प.तर्फे विलंबाबाबत कुठलेही स्पष्टीकरण तोंडी / लेखी मंचासमोर दिले नाही. कृती मानके विनियमातील तरतूदींची पूर्तता करण्यात वि.प.ला अपयश आल्याने तक्रारदारांस भरपाई मिळण्याचा हक्क प्राप्त झाला आहे. त्यामुळे एस.ओ.पी. प्रमाणे विलंबापोटी रु. १००/– प्रति आठवडा या प्रमाणे ७ आठवड्यांचे रु.७००/– भरपाई वि.प.ने तक्रारदारास द्यावी. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वि.प.ने दि. २९.१.२०१० ते दि. २४.३.२०१० या कालावधीतील ७ आठवडे विलंबापोटी तक्रारदार यांस प्रति आठवडा रु. १००/– प्रमाणे रु. ७००/– कृती मानके विनियमातील तरतुदीचे पालन करण्यात अपयश आल्याने भरपाई द्यावी.

३) सदरची रक्कम ३ बिलींग सायकलमध्ये समायोजित करण्यात यावी व उर्वरित रक्कम तक्रारदार यांस रोखीने देणेत यावी.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६  ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५)  या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे  करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष